सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 399 ठ. क्र. 303
दि. 29/12/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मनपा मालकीचे मेजर शॉपिंग सेंटर मधील गाळै लिलाव प्रक्रियानुसार मा.शासनाकडील प्राप्त आदेशानुसार पुढील कार्यवाही ठेवणेबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मा.शासनाकडील आदेश व मा.विधान सल्लागार यांचेकडील अभिप्रायानुसार महानगरपालिकेचे आर्थिक हिताचे दृष्टीने प्रस्तावात नमूद अ.क्र.१ ते ५ मुद्द्यांवर कार्यवाही ठेवणे उचित होणा आहे. तरी प्रस्तावात नमूद १ ते ५ मुद्द्यांवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यकत असलेने सदरचा मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेकामी मा.आयुक्त यांचे दि.०७/१२/१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रशासनाने सुचविलेले दर वगळून, म.न.पा. सर्वसाधारण सभेने इमारतीचे घसारा विचारांत घेऊन खालील प्रमाणे दर व डिपॉझिट सूचविणेत आलेले असून यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | शॉपिंग सेंटरचे नाव | तळ मजला भाडेदार प्रती चौ.फूट प्रशासनानी सुचविलेले दर | मा.मनपा सभेने सुचविलेले प्रती चौ.फूट दर | पहिला मजला भाडेदार प्रती चौ.फूट प्रशासनानी सुचविलेले दर | मा.मनपा सभेने सुचविलेले दर प्रती चौ.फूट दर | डिपॉझिट प्रती चौ.फूट दर प्रशासनानी सुचविलेले दर | मा.मनपा सभेने सुचविलेले प्रती चौ.फूट दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जूनी जनता (नवी पेठ) | १९०.०० | ११४ | १५२.०० | ९१ | ३६५०.०० | १८२५ |
| २ | कुभांरवेस (कोंतक चौक) | ६१.०० | ३७ | ४८.८० | २९ | २७००.०० | १३५० |
| ३ | शुक्रवार पेठ (ढोर गल्ली) | ५३.०० | ३७ | ४२.४० | २९ | १५५०.०० | ७७५ |
| ४ | जूनी सुंदरम नगर (RTO रोड) | २२.०० | १५ | १७.६० | १३ | ७००.०० | ३५० |
| ५ | नवीन सुंदरम नगर (RTO रोड) | २४.०० | १७ | १९.२० | १३ | ७००.०० | ३५० |
| ६ | लाल बहाद्दूर शास्त्री (नवी पेठ) | १९९.०० | ११९ | १५९.२० | ९५ | ३८००.०० | १९०० |
| ७ | कोटणीस (सिध्देश्वर पेठ) | ११७.०० | ६४ | १४१.६० | १०० | ३६००.०० | १८०० |
| ८ | जूना बैलगोठा (नवी पेठ) | २०५.०० | १२३ | १६४.०० | ९८ | ३९००.०० | १९५० |
| ९ | हुतात्मा (पार्क चौक) | १७०.०० | १०२ | १३६.०० | ८२ | ३५००.०० | १७५० |
| १० | नवीन जनता (नवी पेठ) | २००.०० | १२० | १६०.०० | ९६ | ३८००.०० | १९०० |
| ११ | गणेश पेठ (मंगळवार बजार) | ३३.०० | २३ | २६.४० | १८ | ६००.०० | ३०० |
| १२ | भूलाभाई चौक (राजेंद्र चौक) | ४९.०० | ३४ | ३९.२० | २७ | ९००.०० | ४५० |
| १३ | अंत्रोळीकर (दत्त चौक) | १८५.०० | १३० | १४८.०० | १०४ | ३६००.०० | १८०० |
| १४ | सह्याद्री (एम्प्लॉयमेंट चौक) | १८०.०० | १२६ | १४४.०० | १०१ | ३६००.०० | १८०० |
| १५ | चैतन्य नगर (भारती विद्यापीठ) | ३३.०० | २३ | २६.४० | १८ | ९५०.०० | ४७५ |
| १६ | वीर राणी कित्तुर चन्नमा (साखर पेठ) | ३५.०० | २५ | २८.०० | २० | ७५०.०० | ३७५ |
| १७ | गुरुनानक चौक (कुमठा नाका) | २३.०० | १६ | १८.४० | १२ | ८००.०० | ४०० |
| १८ | साखर पेठ (साखर पेठ विहीर) | ४०.०० | २८ | ३२.०० | २२ | १५००.०० | ७५० |
| १९ | राणी लक्ष्मी बाई (विजापूर वेस) | २८.०० | २० | २२.४० | ९१ | ९००.०० | ४५० |

१) महानगरपालिकेचे मा.सर्वसाधारण सभा ,मा.स्थायी समितीच्या ठरावाप्रमाणे सार्वजनिक,शैक्षणिक व सामाजिक संस्थाना करारपत्र करुन ज्या जागा भाडयाने दिलेल्या आहेत त्यांना त्यांच्या करारपत्राप्रमाणेच भाडे आकारण्यात यावे. त्यांना कोणत्याही प्रकारची डिपॉझिटची आकारणी करण्यांत येऊ नये. ज्या परपज साठी गाळा देण्यात आला आहे. त्याच परपजकरिता वापर होणे आवश्यक आहे अन्यथा भंग झालेस योग्यती कारवाई ठेवावी.

२) अंध,अपंग,दिव्यांग व मतीमंद यांचेकरिता महानगरपालिकेचे मिनी व मेजर शॉपिंग सेंटरमधील ३ टक्के राखीव ठेवण्यांत यावे.
३) मेजर व मिनी शॉपिंग सेंटरमधील गाळयांना मागची मुदतवाढ ग्राहय धरुन यापुढे ५ वर्षाची मुदतवाढ देणेत यावी.
४) मागील हंस्तातराकरिता मेजर शॉपिंग सेंटरचे हस्तांतरणासाठी र.रु. १.०० लाख व मिनी शॉपिंग सेंटरचे हस्तांतरणासाठी र.रु. २५,०००/ याप्रमाणे घेणेस मान्यता देण्यांत येत आहे.

५) यापुढे गाळे धारखांकडून मनपाने त्यांचेशी केलेल्या कराराचा भंग झाल्यास मनपाने सदरचा गाळा ताब्यात घेऊन त्याचा लिलाव पध्दतीनुसार गाळा इतरांना भाडयाने देण्यास मान्यता देणेत येत आहे.
६) ज्या लोकांनी यापुर्वी झालेल्या म.न.पाचे गाळे लिलावात भाग घेतला होता त्यावेळी त्यांनी खातेचा डी.डी. दिले होते ते डी.डी. त्या लोकांना परत देण्यात यावेत.
७) सध्या बंद व सील असलेल्या गाळयांना त्यांचेकडून १०० टक्के थकबाकी वसुली करुन ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.
८) मिनी शॉपिंग सेंटरमधील गाळयांचे सुध्दा इमारतीचा घसारा काढून त्यांचे दर निश्चित करण्यांत यावेत.
मेजर व मिनी शॉपिंग सेंटरमधील सर्व गाळयांसाठी वरील नमूद बाबीनुसार कार्यवाही ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका